## संक्षिप्त वृत्त



**मोहोळ : रिपाई सरवदे यांच्या वाढदिवसानिमित्त मुलांना स्वादिष्ट भोजन देण्यात आले.**

### रिपाई युवकच्या वतीने राजा भाऊ सरवदे यांचा वाढदिवस साजरा

**मोहोळ** : रिपाईचे राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांचा वाढदिवस मोहोळ तालुका युवक आघाडीच्या वतीने विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला यावेळी युवक आघाडीचे जिल्हा अध्यक्ष तात्यासाहेब उर्फ मार्तंड काळे जेष्ठ नेते कुमार ढवळे जिल्हा कोषाध्यक्ष विठठल क्षिरसागर अंकूश शेंडगे नानासाहेब सोनवणे पोपट कापूरे मिलिंद कुचेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मुकबधीर निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना स्वादीष्ठ भोजन देण्यात आले यावेळी राजाभाऊ सरवदे यांनीआजवर केलेल्या सामाजिक कार्याची माहिती सांगण्यात आली यावेळी युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष अमोल जगताप केदार कांबळे साजन जगताप आबासाहेब कुचेकर महाविर मोरे आनंद सरवदे महेश कुचेकर शिवाजी चंदनशिवे प्रविण शेंडगे आदींनी परिश्रम घेतले.

---



**मंगळवेढा : बदलापूर अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडी तर्फे काळ्या फिती लावून आंदोलन.**

### बदलापूर अत्याचार प्रकरणी मंगळवेढ्यामध्ये महा विकास आघाडी कडून काळ्याफिती लावून बैठे आंदोलन

**मंगळवेढा** : बदलापूर अत्याचार प्रकरणी महाविकास आघाडी तर्फे आज शनिवार दिनांक २४ रोजी महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती परंतु माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र बंद आंदोलन मागे घेण्यात आले. माननीय उच्च न्यायालयाने हे आंदोलन बेकायदेशीर ठरवले होते. म्हणून उच्च न्यायालयाचा आदर करत महाविकास आघाडीने संपूर्ण महाराष्ट्र मध्ये काळ्याफिती लावून या घटनेचा निषेध व्यक्त केला. मंगळवेढ्यातील प्रांत कार्यालयासमोर असणाऱ्या महात्मा गांधीच्या पुतळ्यासमोर बसून मौन धारण करून या घटनेचा निषेध महाविकास आघाडीने केला .यावेळी नंदकुमार पवार, राहुल शहा, मारुती वाकडे, दिलीप जाधव, पांडुरंग जावळे, पांडुरंग माळी, येताळा भगत, दत्तात्रय भोसले, संतोष रंदिवे, एनसीपी युवक शहर अध्यक्ष जमीर इनामदार, सदाशिव माळी, वैभव ठेंगील , सचिन वडतिले, सुहास मुरडे , विलास जाधव, आयाज शेख, बापू अवघडे, तसलीम आकुंजी, पांडुरंग निराळे, शहाजी कांबळे, राजू ठेंगील, संदीप पवार आदी उपस्थित होते.

---



**पंढरपूर : येथील गंगाई सपाटे शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धेत प्रशालेतील १२ मुले व १२ मुलींनी सहभागी असलेले प्रशालेतील यशाचे मानकरी.**

### गंगाई सपाटे प्रशालेच्या विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय वुशु स्पर्धेत घवघवीत यश

**पंढरपूर** : येथील गंगाई सपाटे शिक्षण संकुलातील विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले जिल्हास्तरीय वुशू स्पर्धा श्री.दत्त विद्यामंदिर सुस्ते या ठिकाणी पार पडल्या.प्रशालेतील १२ मुले व १२ मुलींनी सहभाग नोंदवला. प्रशालेतील यशाचे मानकरी खालील प्रमाणे आहेत.
चि.यश मनोहर सावंत ६५ किलोखालील वजन गटात प्रथम क्रमांक,कु.अपर्णा सतीश माने ४० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक, कु.सृष्टी दादासो जगताप ७० किलो खालील वजन गटात प्रथम क्रमांक, कु.तेजस्विनी देविदास ओव्हाळ ६५ किलो खालील वजन गटात द्वितीय क्रमांक.चि.हर्षवर्धन अरुण रणदिवे ६० किलो खालील वजन गटात द्वितीय क्रमांक, चि.प्रज्वल सोमनाथ देडगे ६५ किलो खालील वजन गटात द्वितीय क्रमांक चि.आदेश दीपक सातपुते ५० किलो खालील वजन गटात द्वितीय क्रमांक,कु. प्राजक्ता सुभाष बनसोडे ४५ किलो वजन गटात तृतीय क्रमांक, कु. साक्षी शिवा भुई ४२ किलो खालील वजन गटात तृतीय क्रमांक, चि.भाग्यश्री नितीन ढाळे ५२ खालील वजन गटात तृतीय क्रमांक, कु.सायली भाऊसो काळे ५५ किलो खालील वजन गटात तृतीय क्रमांक, कु.संस्कृती सिद्धेश्वर पवार ६५ किलो खालील वजन गटात तृतीय क्रमांक,कु.अनुराधा दशरथ काळे ६० किलो खालील वजन गटात तृतीय क्रमांक, कु.रिया मुलाणी ५२ खालील वजन तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.कु.अपर्णा सतीश माने कु.सृष्टी दादासो जगताप व चि.यश सावंत या तीनही विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशालेचे क्रीडा शिक्षक विलास डाखोरे व वुशूचे क्रीडा मार्गदर्शक माधव शेरीकर यांचे मार्गदर्शन लाभले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा प्रशालेचे मुख्याध्यापक महंमद शेख यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन करण्यात आला व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मनोहरजी सपाटे सचिव डॉ.अनिल बारबोले प्रशालेचे मुख्याध्यापक महंमद शेख यांनी कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशालेतील सर्व विद्यार्थी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# मातंग समाजाला राजकीय प्रतिनिधित्व मिळण्यासाठी समाजाने एकत्र येण्याची गरज : प्रा. सुकुमार कांबळे

**करमाळा/प्रतिनिधी**




**करमाळा** : तालुक्यातील अंजनडोह येथे डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे हे व्याख्यानात बोलताना.

देशाच्या राजकारणात प्रत्येक समाजाचा सहभाग असलेले वेगवेगळे राजकीय पक्ष असून त्या आधारे जो तो समाज स्वतःची प्रगती करून घेत आहे. मात्र असंघटित असलेल्या मातंग समाजाने देवादिक कार्ये, अंधश्रद्धा, व्यसने, अशिक्षितपणा आदी नकारात्मक गोष्टींच्या जोखडातून निघून संघटित होण्याची आणि देशातील एक मजबूत राजकीय घटक होण्याची गरज असल्याचे मत डेमोक्रेटिक पार्टी ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रा. सुकुमार कांबळे यांनी व्यक्त केले.

करमाळा तालुक्यातील अंजनडोह येथील डॉ. अण्णाभाऊ साठे तरुण मंडळ आणि ए.बी.एस. ग्रुप यांच्यावतीने लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

यावेळी व्याख्यानात पुढे बोलताना प्रा कांबळे यांनी सांगितले की देशातील सत्ताकारण करणारे विविध पक्ष हे एका एका समाजाचे प्रतिनिधित्व करणारे घटक आहेत. देशातील बहुसंख्य समाज हा अशा पक्षांकडे केंद्रित झालेला असल्याने या माध्यमातून त्या त्या समाजाची प्रगती साधली जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर असलेल्या मातंग समाजालाही अशाच केंद्रीकृत पक्षाची गरज असल्याने डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया या पक्षाची निर्मिती करण्यात आली असून मातंग समाजाने अनिष्ट रूढी, परंपरा, व्यसने, गुलामगिरी झुगारून आपली ताकद वेळीच ओळखून घेऊन एकजुटीने आपले हक्क आणि अधिकार मिळवण्यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या माध्यमातून आपली प्रगती साधली पाहिजे. वंचित असणाऱ्या इतर समाजांतील घटक पक्षांनीही एकत्र येऊन देशाचे सत्ताकारण आपल्या हातात घेण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया यांनी यासाठी एकत्र येण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी बोलून दाखवले.

शनिवार दि. २४ रोजी सायंकाळी सहा वाजता झालेल्या या व्याख्याना वेळी व्यासपीठावर संविधान सन्मान रॅलीचे जनक तथा आर.पी.आय. (आ) चे पश्मिच महाराष्ट्र संघटक नागेशदादा कांबळे, करमाळ्याचे माजी नगराध्यक्ष दिपक ओहोळ, दलित सेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण भोसले, दैनिक पुण्यनगरींचे तालुका प्रतिनिधी पत्रकार प्रफुल्ल दामोदरे, अंजनडोहचे सरपंच प्रतिनिधी अमोल शेळके, मांजरगावच्या माजी सरपंच साधनाताई खरात, टेंभुर्णीचे युवा नेते शेखर जगताप, जिंतीचे सामाजिक कार्यकर्ते संदीप जगताप, डॉ. अशोक शेळके, अंकुश दुरगुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

साहित्यरत्न डॉ. आण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे आणि सोलापूर येथील विमानतळास लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे, असा ठराव या सभेत सर्वानुमते घेण्यात आला. व्याख्यानानंतर रात्री ८ ते ११ या वेळेत कोमलताई पाटोळे, मेंढापूरकर यांच्या लोकशाहीर साहीत्य सम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर आधारित गीतांचा भव्य कार्यक्रम शेकडोंच्या उपस्थितीत पार पडला.

हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महादेव रणदिवे (अध्यक्ष, आर.पी.आय. करमाळा), अंजनडोह चे माजी सरपंच कैलास रणदिवे, झोपडपट्टी सुरक्षा दलाचे राज्य संघटक संतोष कुंडलिक, पोपट रोकडे, लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे तरुण मित्र मंडळाचे अध्यक्ष पै. उमेश रणदिवे, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर रणदिवे, खजिनदार पै. हनुमंत रणदिवे, सदस्य नवनाथ रणदिवे, दीपक रणदिवे यांच्यासह ए.बी. एस. ग्रुपचे सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

## राज्यात महिलांवर वाढते अत्याचार; पंढरपूर तालुका काँग्रेसकडून महायुती सरकारचा निषेध

**पंढरपूर/प्रतिनिधी**



**पंढरपूर** : बदलापूर प्रकरणाचा तालुका काँग्रेस कमिटीकडून निषेध करीत करकंब सहा.पो.नि. सागर कुंजीर यांच्याकडे सुपूर्द.

राज्यात दिवसेंदिवस महिलांवर अत्याचार वाढतच आहेत. यामुळेच बदलापूर सारख्या अनेक घटना राज्यात घडत आहेत. राज्यातील कायदा सुव्यवस्था ढासळली आहे. यास राज्यातील महायुती सरकारच जबाबदार आहे. या घटनांचा निषेध पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटी कडून नोंदवण्यात आला. सरकारचा निषेध नोंदवून काँग्रेसकडून अनेक मागण्या मांडण्यात आल्या.

महाविकास आघडीकडून २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंद पुकारण्यात आला होता. परंतु उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे हा बंद मागे घेण्यात आला. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून ठिकठिकाणी महायुती सरकारचा निषेध नोंदवण्यात येत आहे.

पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हनुमंत मोरे यांनी याबाबतचे निवेदन, करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर यांच्याकडे सुपूर्द केले .यानुसार बदलापूर, कलकत्ता ,कोल्हापूर ,अकोला येथील बलात्कार व अत्याचार करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा सुनावण्यात यावी, पीडित व त्यांच्या कुटुंबीयांना संरक्षण देण्यात यावे ,सदरच्या शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी , महिलांसाठी सुरक्षित बहिण योजना राबवून, त्यासाठीची कार्यप्रणाली आखण्यात यावी, शाळा परिसर, शिक्षक स्टाफ, तसेच मुख्याध्यापक यांच्या कार्यालयात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, राज्यातील बेपत्ता मुलींच्या शोधासाठी विशेष पथक नेमण्यात यावे, तसेच विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी सुरक्षा पथक नेमण्यात यावे, अशा मागण्या या निवेदनाद्वारे करण्यात आले आहेत.

याप्रसंगी मनोज गावंधरे ,संजय थिटे, पिंटू लोंढे ,अशोक अवताडे ,नवनाथ घोडके, भैय्या जमदाडे, हनुमंत नाईकनवरे, महादेव गायकवाड यांच्यासह काँग्रेस पक्षाचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## म्हेत्रे प्रशालेचे तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत यश

**अक्कलकोट/प्रतिनिधी**



**अक्कलकोट : सांघिक खो - खो (मुली) क्रीडा स्पर्धेत मातोश्री लक्ष्मीबाई सातलिंगप्पा म्हेत्रे प्रशालेतील खेळाडू व शिक्षकवर्ग.**

तालुकास्तरीय १७ वर्षाखालील सांघिक खो - खो (मुली) क्रीडा स्पर्धेत मातोश्री लक्ष्मीबाई सातलिंगप्पा म्हेत्रे प्रशालेतील खेळाडूंनी घवघवीत यश प्राप्त केले.

हा सामना एस. जी. परमशेट्टी हायस्कूल विरुद्ध म्हेत्रे प्रशाला असा होता. दोन्ही संघ दुधनीचे स्थानिक असल्याने सामना रोमहर्षक आणि अटीतटीचा झाला. या सामन्यात म्हेत्रे प्रशालेच्या संघाने प्रतिस्पर्धी संघावर मात करत हा सामना जिंकला.

या सामन्यात म्हेत्रे प्रशालेचे खेळाडू तायम्मा अळळगी, प्रकृती बनसोडे, रेणुका नाव्ही, साक्षी मुगळे, सुगलाबई जेवर्गी, रंजीता सोनकांबळे, धनम्मा बुरुड, रमाबाई सिन्नुर, राधिका कळसगोंड, लक्ष्मी उजनी, सारिका सोनकांबळे, अंकिता सिन्नूर, सुनिता कोळी यांनी उत्तमरित्या खेळात आपले कौशल्य दाखविले. तसेच या संघाची जिल्हास्तरीय खो - खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

वरील सर्व खेळाडूंना क्रिडा शिक्षक श्री. एकनाथ मोसलगी यांचे मार्गदर्शन लाभले.

या सर्व यशस्वी खेळाडूंचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष शंकर म्हेत्रे, सचिव प्रथमेश म्हेत्रे, सहसचिव महादेव खेड , शाळा व कॉलेजचे प्राचार्य सिद्धाराम पाटील, रामचंद्र गद्दी, शरणगौडा पाटील तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आणि पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिले.

## वेळापूर येथे बदलापूर घटनेचा निषेध



**वेळापूर : बदलापूर येथे दोन अल्पवयीन मुलीवर झालेले अत्याचाराच्या निषेधार्थ वेळापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते उत्तमराव जानकर व त्यांच्या कार्यकर्त्यांनी काळे फीत बांधून निषेध व्यक्त केला.**

**वेळापूर/प्रतिनिधी**

वेळापूर येथे , बदलापूर मध्ये दोन अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचारामुळे संपूर्ण देश हादरला आहे.माणुसकीला काळीमा फासणारी घटना बदलापूरमध्ये घडली, या घटनेच्या निषेधार्थ शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती उत्तमराव जानकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसह निषेध व्यक्त केला.

बदलापूर येथील अत्याचार झालेल्या चिमूरड्यांना लवकरात लवकर न्याय मिळावा. असे कृत्य करणाऱ्या नराधमास फाशीची शिक्षा लवकरात लवकर व्हावी. या मागणीसह उत्तमराव जानकर यांनी निषेध व्यक्त केला.

यावेळी वेळापूर गावचे सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगुसकर, अकलूज मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, माजी उपसरपंच जावेद मुलाणी, नजीरभाई शेख, धानोरे माजी सरपंच जीवन जानकर , प्रताप मगर, आरटीओ संघटना महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्ष संजय देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते अमोल पनासे ,अशोक साठे, जवान माने देशमुख, रणजीत सरवदे, रणजीत बनसोडे, यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य,गावातील प्रमुख मान्यवर- पदाधिकारी, ग्रामस्थ, उपस्थित होते.

## बसस्थानक परिसरात कॉंक्रीट करा लहुजी शक्ती सेनेचे निवेदन

**अक्कलकोट/प्रतिनिधी**



अक्कलकोट बसस्थानक आगार प्रमुख याना डोळे असुन प्रवाशांचे हाल दिसत नाहीत का ? बसस्थानक परिसरात पावसामुळे चिखल सखल भागात पाणी साचत आहे . जेष्ठ नागरिक वृद्ध महिला लहान मुले घेऊन जाणारे माता भगिनी एस टी मध्ये चढताना उतरताना चिखल मुळे पाय घसरत आहेत अपंग व्यक्ती तर चिखल पाण्यातून मार्गक्रमण करणे अंत्यत कष्टदायक झाले आहे चिखलामुळे पाय घसरून मुका मार लागल्याने जायबंदी होत आहेत यामुळे बसस्थानक फलाट तातडीने कॉंक्रिट करा अन्यथा लहुजी शक्ती सेना यांच्यावतीने बसस्थानक अक्कलकोट येथे हालगी नाद आंदोलन करण्याचा इशारा लहुजी शक्ति सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे शिवलाल राठोड यांच्या शिष्ठ मंडळाच्या वतीने सहाय्यक आगार व्यवस्थापक धनसिंग चव्हाण यानां दिलेल्या निवेदनात इशारा देण्यात आला आहे .

अक्कलकोट येथील नवे बसस्थानक पुर्ण होण्यास बराच कालावधी जाणार आहे तोपर्यत प्रवशांची सुरक्षा आगार प्रमुख वाऱ्यावर सोडणार आहात का ? बसस्थानक आवारातील चिखल दलदल तातडीन नष्ट करा प्रवशाची सुरक्षेसाठी प्राधान्य दया . बस फलाट व परिसर तातडीने क्रॉंक्रीट करा अक्कलकोट बसस्थानकात चिखल व पाण्यामुळे प्रवाशानां बसस्थानकात प्रवेश करणे अंत्यत जिकरीचे धोकादायक बनले आहे

प्रवाशी धोक्यादावक स्थिती मध्ये बस स्थानकात वावरत आहेत . प्रवाशाची सुरक्षा धोक्यात आली आहे चिखल पाणी थांबल्याने डास वाढली आहेत.

# अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा केली तरच महिला सुरक्षित राहतील : ह.भ.प. लक्ष्मणराव आसबे

**माळशिरस/प्रतिनिधी**

इंटरनेटचा वाढता गैरवापर, त्यावर सहजा सहजी उपलब्ध होणारे अश्लिल साहित्य आणि ते समाजाच्या तळा गाळा पर्यंत पोहोचवण्याचे काम करणारा सोशल मिडीया यामुळे भारताची भावी पिढी बरबाद होत आहे. अश्लिलतेने विकृतीची परिसिमा गाठली आहे. त्यामुळेच बलात्काराचे प्रमाण वाढले आहे. असल्या विकृत कृत करणाऱ्या कठोर शासन करणे गरजेचे आहे. असे केले तरच स्त्रीयांवरील अत्याचार थांबतील असे मत ह.भ.प. लक्ष्मणराव आसबे यांनी व्यक्त केले.

वै.ह.भ.प. सुखदेवआप्पा जनार्दन शिंदे यांच्या ८७ व्या जयंती निमित्त हनुमान हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, तांदुळवाडी येथे दि. २३ ऑगस्ट ते २५ ऑगस्ट या कालावधीत राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धा, रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या वक्तृत्व स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ आज रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कामधेनू सेवा परिवाराचे अध्यक्ष ह.भ.प. लक्ष्मणराव आसबे बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या



**माळशिरस** : वै.ह.भ.प. सुखदेवआप्पा जनार्दन शिंदे यांच्या ८७ व्या जयंती निमित्त राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, सामान्यज्ञान स्पर्धेतील विद्यार्थ्यांना बक्षिसाचे देताना मान्यवर

अध्यक्षस्थानी शिवाजी दुधाट, प्रमुख उपस्थितीमध्ये संस्थेचे मार्गदरशक मिलिंद शिंदे, विजय पवार, ज्ञानेश्वर उघडे, दत्तात्रय उघडे, शशिकांत कदम, अभिमान मिले, स्पर्धा प्रमुख विठ्ठल साळुंखे उपस्थित होते. स्पर्धेसाठी पुणे, अकोला, कोल्हापूर, सातारा, रत्नागिरी, सोलापूर, अहमदनगर, संभाजीनगर, धाराशिव जिल्ह्यांतून सुमारे ३९४ स्पर्धक आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विठ्ठल साळुंखे यांनी केले तर आभार वाघमारे यांनी मानले.

वकृत्त्व स्पर्धेतील इ. १ ली ते ४ थी गटामध्ये गाथा मिले (प्रथम), स्वराली बुंजकर (द्वितीय), संस्कृती बेहेरे (तृतीय), चैतन्य पालवे (चतुर्थ), शार्दुल नारनवर व परिक्षित यादव (विभागून पाचवा) यांनी यश संपादन केले. इ. ५ वी ते ७ वी गटामध्ये श्रवण आरसुळ (प्रथम), ज्योतिरादित्य देशमुख (द्वितीय), प्रणव जाधव (तृतीय), विराज खाडे (चतुर्थ) व आराध्या पाटील (पाचवा) यांनी यश संपादन केले.

इ. ८ वी ते १० वी गटामध्ये समिक्षा चव्हाण व यशराज हेगडे (विभागुन प्रथम), तनिष्का जाधव-देशमुख व श्रेया काटकर (विभागुन द्वितीय), प्रगती सट्टे व आदिती घोगरे.